# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

( महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ )

32 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - 400 005.

दूरध्वनी : (022)2215 1847 फॅक्स :(022) 22151867 ई मेल: info.mahasecurity@maharashtra.gov.in

जा.क्र.: मरासुम / आस्थापना / कंत्राट नुतनीकरण धोरण /324/ २०२२ दि. 21-०२-२०२२

## -: कार्यालयीन आदेश :-

### विषय :- सुरक्षा कर्मीच्या कंत्राट नुतनीकरणाबाबचे धोरण.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत विविध आस्थापनेवर सुरक्षा कर्मीची **११** महिन्याच्या कंत्राटी स्वरुपात सेवा पुरविण्यात येते.

सुरक्षा कर्मीचा **११** महिन्याचा कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना एक दिवसांचा **तांत्रिक खंड (Break)** देऊन त्यांचे पुढील कंत्राट नुतनीकरण करण्यात येते. दिनांक १८-०४-२०१९ रोजीच्या मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेनुसार महामंडळातील कार्यरत असलेल्या सुरक्षा कर्मीच्या कंत्राट नुतनीकरणाच्या नियमावलीची (**Contract Renewal**) बाब येथे लागु करण्यात आली होती. त्यामध्ये अंशतः बदल करुन खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. सुरक्षा कर्मीचे कंत्राट नुतनीकरणाची प्रक्रिया करतेवेळी ज्या सुरक्षा कर्मीचे लगतच्या (चालु) कंत्राटमध्ये **५०** दिवसापेक्षा जास्त दिवस गैरहजेरी असल्यास त्याबाबत सुरक्षा कर्मीकडून लेखी स्वरुपात खुलासा मागविण्यात येईल. प्राप्त झालेला खुलासा वरिष्ठामार्फत योग्य ती पडताळणी व कार्यवाही करुन सदरचा खुलासा समाधान कारक असल्यास, त्यांचे कंत्राट नुतनीकरण करण्यात येईल.

२. सुरक्षा कर्मीचे लगतच्या (चालु) कंत्राटमध्ये **५०** दिवसापेक्षा जास्त दिवस गैरहजेरी, कसुरी अथवा शिक्षा, आणि त्यांच्या चारित्र्य पडताळणी मध्ये गुन्हा दाखल असल्याचे आढळुन आल्यास, अशा सुरक्षा कर्मीकडून लेखी स्वरुपात खुलासा मागविण्यात येईल. सुरक्षा कर्मीनी लेखी स्वरुपात खुलासा सादर न केल्यास त्यांचे काही एक म्हणने नाही. असे समजुन त्यांचे कंत्राट नुतनीकरण करण्यात येणार नाही.

३. सुरक्षा कर्मीचे लगतच्या (चालु) कंत्राटमध्ये कसुरी अथवा शिक्षा इत्यादी बाबत वरिष्ठामार्फत योग्य ती पडताळणी करुन त्यांचे कंत्राट नुतनीकरण करण्यात येईल.

४. सुरक्षा कर्मीचे कंत्राट नुतनीकरण करतांना त्यांच्या चारित्र्य पडताळणीच्या निकषाच्या अधिन राहून कंत्राट नुतनीकरण करण्यात येईल.

५. एखाद्या सुरक्षा कर्मीच्या चारित्र्य पडताळणी मध्ये गुन्हा दाखल असल्याचे आढळून आल्यास, अशा सुरक्षा कर्मीकडून लेखी स्वरुपात खुलासा मागविण्यात येईल. सदर खुलासा सोबत न्यायालयाने सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त केल्याचा निकाल सादर केला असल्यास त्यांचे कंत्राट नुतनीकरण करण्यात येईल. अन्यथा कंत्राट नुतनीकरण करण्यात येणार नाही.

(संजय पाण्डेय)
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१. DGP / MD, मरासुम, मुंबई.
२. ADGP / Jt.MD, मरासुम, मुंबई.
३. DIGP / Dy. MD, मरासुम, मुंबई.
४. DIGP / Director (Operation), मरासुम, मुंबई.
५. पोलीस अधिक्षक / महाव्यवस्थापक (अभियान), मरासुम, मुंबई.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी सादर (ईमेलव्दारे)**

१. संचालक (प्रशासन), मरासुम, मुंबई.
२. संचालक (वित्त), मरासुम, मुंबई.
३. संचालक (प्रतिष्ठापना), मरासुम, मुंबई.
४. सर्व आस्थापना प्रभारी अधिकारी, मरासुम, मुंबई.
५. प्रभारी सुरक्षा अधिकारी, नियंत्रण कक्ष, मुंबई.